# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६७३ दिनांक २७.०८.२०२०

## उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार, यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थाची वाहतुक करणा-या आरोपीस अटक करुन ९,०६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दि.२५/०८/२०२० रोजी १७.३० वा.चे सुमारास जव्हार पोलीस ठाणे हद्दीत खंबाळा दुरक्षेत्र येथे ता.जव्हार जि.पालघर येथे यातील आरोपीत नवसु दत्तु खांनजोडे, वय ४२ वर्षे, याने त्यांचे ताब्यातील स्विफ्ट डिझायर गाडी क्रमांक एम.एच.४८,बी.एच.९२८२ मध्ये आरोग्यास अपायकारक आहे असा मुद्देमाल महाराष्ट्र शासनाने अधिसुचनाद्वारे वाहतुकीस विक्रीस प्रतिबंध केलेला आहे हे माहीती असतांना हि शासकीय आदेशाची अवहेलना करुन घेवुन जात असतांना मिळुन आले आहेत. सदर गुन्हयातील आरोपीत याचे ताब्यातुन १)२४,०००/- रुपये. किंमतीची एक सफेद रंगाची गोणी, त्यामध्ये विमल पानमसाला १२० रु. दराप्रमाणे ५० पॅकेट अशा एकुण चार गोणी असे एकुण २०० पॅकेट २)३२,०००/- रुपये किंमतीच्या दोन खाकी रंगाच्या गोण्या, त्यामध्ये विमल पानमसाला ८० रु. दराप्रमाणे ५० पॅकेट अशा एकुण दोन गोणी असे एकुण ४०० पॅकेट ३)८,५०,०००/- रुपये किंमतीची तपकीरी रंगाची स्विफ्ट डिझायर गाडी क्रमांक एम.एच.४८, बी.एच. ९२८२, असा एकुण ९,०६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. म्हणुन जव्हार पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I १३४/२०२० भारतीय दंड सहिता कलम ३२८, २७२, २७३, १८८ प्रमाणे, गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयाती आरोपीत यास दि.२६.०८.२०२० रोजी अटक करण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री.भागवत सोनवणे, उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय जव्हार येथील अधिकारी कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner